
श्रीसमर्थ - अभिप्रेत

# लोकनेता



स्वस्तिश्री प्रकाशन

**प्रकाशक :**
स्वस्तिश्री प्रकाशन
''स्वस्तिश्री''
४४/९, नवसह्याद्री सोसायटी
नवसह्याद्री डाकघरासमोर,
पुणे ४११ ०५२.
दूरध्वनी : ३४ १३ २१

★

दुसरी आवृत्ती : १००० प्रती
कार्तिक वद्य अष्टमी, शके १९१८
३ डिसेंबर १९९६

★

सर्व हक्क प्रकाशकाधीन

★

**अक्षर जुळणी, रचना व मुद्रण :**
सारांश अँडस्
गद्रे चेंबर्स, १३५८, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी - ४७ ७० १९

★

किंमत रु. १५/-

॥ श्रीराम ॥

सादर नमस्कार,

ह्या पुस्तिकेची ही दुसरी आवृत्ती प्रकाशित करताना आम्हाला निश्चितच आनंद होत आहे. भारतीय संस्कृतीच्या संरक्षण संवर्धनाच्या दृष्टीने योग्य असे विचार समाजापुढे आणणे अत्यावश्यक आहे, ह्या प्रेरणेतून धार्मिक तसेच समाजाला मार्गदर्शक पुस्तके प्रकाशित करण्याचा उपक्रम 'आनंदीकृपा न्यास' तर्फे चालू आहे. ह्या विचारधारेस अनुलक्षून आतापर्यंत स्वस्तिश्री प्रकाशनाच्या माध्यमातून एकूण दहा पुस्तके प्रकाशित करण्यात आली आहेत.

'श्रीसमर्थ अभिप्रेत लोकनेता' ही पुस्तिका संकलन करून मराठी व हिंदीमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे. ह्याशिवायही काही ग्रंथ प्रकाशनाचे मार्गावर आहेत आणि अशा प्रकारची पुस्तके प्रकाशित करून समाजप्रबोधनाचे कार्यात 'स्वस्तिश्री प्रकाशन' ला आपण सर्वांनी वारंवार प्रोत्साहित केले आहे.

ह्या पुस्तिकेची प्रथमावृत्ती ही कै. शंकर श्रीकृष्ण ऊर्फ नानासाहेब देव ह्यांनी धुळे येथील स्थापन केलेल्या 'सत्कार्योत्तेजक सभेला' शंभर वर्षे पूर्ण झाली त्यावर्षी म्हणजे इ. स. १९९२ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.

आज अनेक लोकांनी ह्या पुस्तिकेची परत मागणी केलेली आहे. ही दुसरी आवृत्ती प्रसिद्ध करतानाही मा. श्री. सुरेशराव केतकर ह्यांनी प्रथमावृत्तीला दिलेली प्रस्तावना जशीच्या तशी प्रसिद्ध करीत आहोत.

अशाप्रकारे थोर विभूतींचे व वंदनीय संतांचे विचार, समाजातील जास्तीत जास्त लोकांपर्यंत केवळ रु. ५/- (रु. पाच) फक्त ह्या अल्प किंमतीत ह्या पुस्तिकेच्या द्वारें पोहोचविण्याचा प्रयत्न आम्ही १९९२ साली केला होता. त्यास मिळालेल्या प्रतिसादामुळेच आज ही द्वितीयावृत्ती 'स्वस्तिश्री प्रकाशन' प्रसिद्ध करीत आहे. अर्थात ही दुसरी आवृती प्रकाशित करतांना काही लोकांच्या मागणीप्रमाणे मुखपृष्ठ आपणांपुढे पूर्वीपेक्षा वेगळ्या छपाईत सादर करीत आहोत. एकंदरच छपाईचा वाढता खर्च व कागदाचे वाढते भाव लक्षात घेऊन पुस्तिकेची किंमत वाढविणेही भाग पडले आहे. आपणास ही नवीन स्वरुपातील पुस्तिका निश्चित आवडेल अशी आशा आहे.

ह्या पुस्तक प्रकाशनात 'श्रीसमर्थ सेवा मंडळ, सज्जनगड' आणि 'समर्थ वाग्देवता मंदिर' धुळे ह्या दोन्ही संस्थांनी बहुमोल सहकार्य दिले आहे. 'आनंदी कृपा न्यास' ह्या दोन्ही संस्थांचा व त्यांच्या पदाधिकाऱ्यांचा अत्यंत ऋणी आहे. तसेच श्रीमती विजया भिडे ह्यांनी मुद्रित शोधनाची जबाबदारी सांभाळली. आपण सर्व त्यांचेही कायम ऋणी आहोत.

ही पुस्तिका नवीन स्वरुपात वाचकांना उपयुक्त ठरो आणि पसंत पडो ही श्रीसमर्थचरणीं प्रार्थना.

**पं. कृ. पारेगावकर**
आनंदीकृपा न्यास

॥ श्रीराम ॥

## प्रास्ताविक

''सत्कार्योत्तेजक सभा, धुळे'' या संस्थेच्या स्थापनेस शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. १८९३ साली समर्थहृदय कै. श्री. नानासाहेब देव यांनी या संस्थेची स्थापना केली.

'सत्कार्योत्तेजक सभा' या नावाने कार्यास आरंभ करून अविश्रांत श्रमाने श्रीसमर्थ रामदासस्वामींचे साहित्य संग्रहित करण्याचे एक श्रेष्ठ कार्य करण्यात कै. शंकरराव उपाख्य नानासाहेब देव यांनी आयुष्य वेचले.

समर्थ वाङमय हे समाज-प्रबोधन, समाज-संघटन यासाठी लिहिले गेले. श्रीसमर्थांनी, समाजासमोर केवळ आध्यात्मिक विचार ठेवला नाही, केवळ व्यक्तिगत जीवनाच्या उत्थानाचे विचार साहित्यातून स्पष्ट केल नाहीत. समर्थांचे वाङ्मय राष्ट्रीयत्वाची जाणीव करून देणारे, संपूर्ण सामाजिक परिवर्तन व उत्थानाचे ते वाङ्मय आहे.

केवळ मी नाही तर संपूर्ण समाज सद्विचारी करण्याची शक्ती असलेले श्रीसमर्थ साहित्य आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामी म्हणजे शक्तीची उपासना सांगणारे राष्ट्रसंत आहेत. शक्तीची देवता श्रीहनुमान त्याची भक्ती जागविणारे समर्थ संत म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी. कोदंडधारी श्रीरामाची उपासना सांगणारे व त्यातून शक्तीच्या आधारे सन्माननीय राष्ट्र उभे करण्याची आकांक्षा जागविणारे संत म्हणजे श्रीसमर्थ रामदासस्वामी.

शक्तीसाठी समाज संघटित उभा राहिला पाहिजे. हा समाज-संघटन करणारा महंत, हा लोकसंग्राहक सामाजिक कार्यकर्ता, लोकनेता, श्रीसमर्थांनी दिला. जागोजागी मठ व मठातील संघटक महंत ही कल्पना श्रीसमर्थांनी दिली व साकार करून दाखविली.

*लोकसंग्रह कसा असावा? कसा करावा? करणारा कसा असावा? त्याचे विधिनिषेध कोणते असावेत? या सर्वांचा प्रपंच श्रीसमर्थांनी केला व श्रीसमर्थांनी मांडला.*

*लोकशक्तीचा मार्ग लोकसंग्रह. ही प्रक्रिया जिवंत समाजात अक्षुण्ण चालली पाहिजे. त्यासाठी धर्माच्या ध्रुवध्येयाने समाजात, समाजासाठी, समाजसंघटन करणारा कार्यकर्ता अखंड निर्माण होत राहिला पाहिजे, विकसित होत असला पाहिजे. त्यासाठी श्रीसमर्थांचे मार्गदर्शन समर्थ आहे.*

*त्या चिरंजीव, नित्यपरिणामकारक मार्गदर्शनाचे दर्शन करण्याचा हा प्रयत्न आहे.*

*'सत्कार्योत्तेजक सभा' या संस्थेच्या शताब्दी-वर्षात श्रीसमर्थांचे चिरस्थायी मार्गदर्शन प्रकाशित करताना आम्हास अत्यंत आनंद होत आहे.*

*ही पुस्तिका प्रकाशित करण्यात पुण्याच्या 'आनंदी कृपा न्यास' या संस्थेचे सहकार्य प्राप्त झाले आहे. हाही एक आनंदाचा विषय आहे.*

*ह्या पुस्तिकेचा प्रचार करावा. सर्व प्रांतांत व सर्व भाषांतून याचा अनुवाद करून संपूर्ण देशात, सर्व प्रांतांतून लोकसंग्रह करणारा श्रीसमर्थांचा महंत, आजचा लोकसंघटक, निर्माण करण्यात सफलता मिळवावी.*

*श्रीसमर्थांचा समर्थ विचार, ही कल्पना सफल करण्यात यशस्वी होईल ही खात्री आहे. त्यांचे आशीर्वाद असावेत.*

**सुरेश रामचंद्र केतकर**
*भारतीभवन,*
*५८, राजेंद्रनगर,*
*लखनऊ (उ. प्र.)२२६ ००४*
*दूरध्वनी : २४ ७९ ५१*

## विषयप्रवेश

श्रीसमर्थांनी स्वीकारलेल्या कार्यात लोकसंग्रहाचे त्यांचे कार्य विशेष महत्त्वाचे होते. ह्या कार्याचा उपयोग छत्रपती शिवाजी महाराजांनी हाती घेतलेल्या हिंदुराष्ट्र निर्मितीला मोठ्या प्रमाणावर झाला. श्रीशिवाजी महाराजांच्या कार्याला अनुकूल असे राजकीय व सामाजिक वातावरण निर्माण करण्याकरिता श्रीसमर्थांचा लोकसंग्रह अत्यंत उपयुक्त ठरला.

लोकसंग्रहाच्या दृष्टीने त्यांनी हजार-अकराशे मठ स्थापन केले होते. मठ म्हणजे केंद्र. प्रत्येक केंद्रात एक महंत, म्हणजे त्या केंद्राचा मुख्य. इतर प्रचारक मंडळी, त्यांची राहण्याची व जेवण्याची सोय होण्याच्या दृष्टीने उपयुक्त अशी जागा व बैठकीच्या जागा असणार. कथा-प्रवचनाला उपयुक्त अशी काही ठिकाणी सोय असणार. प्रत्येक केंद्राचा जो महंत असणार तो स्वयंसिद्ध असणार. कारण त्या काळी दूरध्वनी नव्हते. प्रवासाची साधने सहज उपलब्ध नव्हती. असली तरीसुद्धा हल्ली ज्या गतीने प्रवास करता येतो तसे नसणार. म्हणून प्रत्येक महंताला सर्व निर्णय स्वतःच घ्यावे लागत असणार. समर्थांनी निवडलेले महंत लोकसंग्रहाच्या दृष्टीने पूर्णत्त्वाला पोहोचलेले व आध्यात्मिकदृष्ट्या आवश्यक तो अभ्यास झालेले असणार. थोडक्यात तो पूर्ण संस्कारित असणार. लोकसंग्रह करण्याच्या दृष्टीने व परमार्थाच्या दृष्टीने त्याचे शिक्षण कसे झाले असावे, ह्याचा विचार दासबोधाच्या अभ्यासाने करता येतो. महंताला योग्य अशी शिकवण दासबोधात आढळते. दासबोधात अध्यात्म-अभ्यासाच्या दृष्टीने योग्य अशा लिखाणाशिवाय महंतलक्षणावर काही प्रकरणे आहेत. राजकारणावर आहेत. महंताने काय करावे, काय करू नये यावरही दासबोधात विवेचन आहे. म्हणून लोकसंग्रह करणाऱ्याने दासबोधाचा अभ्यास जरूर करावा.

श्रीसमर्थांचा महंत, किंवा लोकनेता, हिंदुधर्मीयांचे संघटन करून संघटनेतील प्रत्येक व्यक्तीचा विकास घडवून आणण्याची क्षमता असणारा आहे. तो उत्तम गुणसंपन्न आहे. ह्या देशाला एक महान् संस्कृती देण्यात

*महत्त्वाचा वाटा असणारे ऋषी, मुनी व राष्ट्रपुरुष त्याचे आदर्श आहेत. त्याची आध्यात्मिक प्रगतीसुद्धा इतरांच्या पुढे आहे. एखादे कमळ पूर्णपणे उमलल्यावर सर्व दृष्टींनी सुंदर दिसते. त्याचप्रमाणे श्रीसमर्थांनी तयार केलेल्या महंताचे जीवन सर्व बाजूंनी विकसित होऊन सौंदर्याने भरलेले असावे अशी समर्थांची धारणा होती. त्यांनी संस्कारित केलेला महंत निःस्वार्थीपणे काम करीत असल्याने तो लोकांना आधार वाटतो. तो लोकांना शहाणेकरून सन्मार्गाला लावतो. एवढेच नव्हे तर समर्थांनी म्हटले आहे की, एका यशस्वी महंताने दुसरे महंत घडवावेत व अंगीकृत कार्य नेटाने वाढवावे.*

***महंते महंत करावे । युक्तीबुद्धीनें भरावे ।***
***जाणते करून विखरावे । नाना देसीं ।***

*समर्थांचे मुख्य कार्य होते,*

***मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें तें राजकारण ।***
***तिसरें तें सावधपण । सर्व विषईं ॥***

*हाच विचार समर्थांनी दासबोधात अजून दोन ठिकाणी निरनिराळ्या विषयांच्या विवेचनात सांगितला आहे.*

***हरिकथा निरूपण । नेमस्तपणें राजकारण ।***
***वर्तायांचे लक्षण । तेंहि असावे ॥***
***हरिकथा निरूपण । बरेपणें राजकारण ।***
***प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥***

*वरील तीन ओव्यांवरून समर्थांचे कार्य काय होते ते समजावून घेता येते.*

*ईशप्राप्तीने व्यक्तिविकास आणि समृद्ध व संघटित असा समाज निर्माण करून समाजविकासकार्य, आजही आवश्यक नाही का ? आणि अशा कार्याला समर्थअभिप्रेत महंत, लोकनेता आवश्यक आहे. म्हणून समर्थांचा महंत समजावून घेण्यासाठी हा प्रयत्न आहे.*

***– संकलक***

## श्रीसमर्थांनी केलेली श्रीरामाची प्रार्थना

कल्याण करी रामराया ।
जन हित विवरी ॥ धु.॥

तळमळ तळमळ होतचि आहे ।
हे जन हाती धरी ॥ १ ॥

अपराधी जन चुकतचि गेले ।
तुझा तूंचि सावरी ॥ २ ॥

कठीण त्यावरी कठीण जालें ।
आतां न दिसे उरी ॥ ३ ॥

कोठें जावें काय करावें ।
आरंभिली बोहरी ॥ ४ ॥

दास म्हणे आम्ही केलें पावलों ।
दयेसि नाहीं सरी ॥ ५ ॥

# लोकनेता

आपण सर्वजण एकाच समाजाचे अंग आहोत, कारण ह्या समाजातील प्रत्येकजण, मग तो लहान असो वा मोठा असो, स्त्री असो वा पुरुष असो, गरीब असो वा श्रीमंत असो, मिळवता असो वा न मिळवता असो, अज्ञानी असो वा विद्वान् असो, सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, सुसंस्कृत असो वा असंस्कृत असो, कसाही असो तो आपल्या समाजात जन्मला आहे, आपल्याच समाजात वाढला आहे, वावरतो आहे, जगतो आहे व ह्याच समाजात राहणार आहे म्हणून आपण ज्या समाजाचे अंग आहोत त्या समाजाचा समग्रपणे विचार आपल्याला करावयास हवा. समाजाची संस्कृती, आचारविचारपद्धती माहीत असणे आवश्यक आहे. आपल्या समाजात कोणत्या सामाजिक मूल्यांना महत्त्व आहे याचा अभ्यासही आवश्यक आहे. समाजात व्यक्ती व समाज यांचे नाते कसे आहे हे समजावून घेणेही महत्त्वाचे ठरते. प्रत्येक व्यक्ती समाजाचा कसा विचार करते? व समाज व्यक्तिविकासाला कसे महत्त्व देतो हे समजले पाहिजे.

मानवसमाजामध्ये सामान्यपणे स्वार्थी माणसांचाच भरणा जास्त असतो. सामान्य माणूस वासनेच्या आधीन असतो. राग व द्वेष यांनी पछाडलेला असतो. लोभी असतो. मानापमानाला बळी पडतो. सर्व इच्छा-आकांक्षांना महत्त्व देतो. त्यांच्या पूर्तीसाठी नीतिनियमांना कधी कधी बाजूलाही ठेवतो. त्याच्या मनात चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, नीति-अनीती, धर्म-अधर्म अशा गोष्टींचा सतत संघर्ष असतो. सामाजिक जीवनात अशा व्यक्तींचा एकमेकांशी संबंध आला की तेथेही संघर्ष निर्माण होतो आणि अशा प्रकारच्या संघर्षाचे प्रमाण जास्त असेल, तर त्या समाजात, शांतीचे, समाधानाचे, एकमेकांचा विचार करण्याचे प्रमाण कमी असते. अशा पद्धतीच्या समाजातील संघर्षाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न लोकसंग्रहातून करणे शक्य होऊ शकते.

ज्या समाजामध्ये ''मी माझ्यासाठीच'' अशा पद्धतीची प्रवृत्ती लोकांमध्ये जास्त असते, त्या समाजामध्ये संघर्ष अनिवार्य होतो. पण ज्या समाजामध्ये ''मी लोकांसाठी'' ही प्रवृत्ती असते त्या समाजात संघटितपणे कार्य चांगल्या प्रकारे घडू शकते. ''मी लोकांसाठी'' या पद्धतीच्या विचाराने समाजात स्वार्थी प्रवृत्तीचे लोक कमी होऊ शकतात.

ज्या धर्मामध्ये ''मी लोकांसाठी'' अशा प्रकारचा मंत्र असू शकतो तेथे स्वतःचा व समाजाचा दोघांचाही विकास घडू शकतो. हिंदुधर्मात समाजधारणेचा व व्यक्तिविकासाचा अशा दोहोंचाही विचार झालेला आहे. उदाहरणार्थ - आपल्या हिंदू धर्मात मृत्यूपूर्वी कमीत कमी तीन ऋणांतून मुक्त होण्याची कल्पना मांडली आहे. देवऋण, ऋषिऋण व पितृऋण ही ती तीन ऋणे होत.

देवऋणातून मुक्त होण्यासाठी प्रत्येकाने धर्मबंधनाचे पालन करून धन कमविण्याची कल्पना मांडली आहे आणि अशाच धनापैकी काही भाग सत्पात्री दान करावे, असे म्हटले आहे. धर्मबंधनाचे पालन करून कमविणे, म्हणजे योग्य मार्गाने धनप्राप्ती करून घेणे, ह्यात व्यक्तिविकास आहे व त्यातील काही भाग सत्पात्री दान करणे, म्हणजे ज्याच्याजवळ कमी आहे किंवा काहीच नाही व ज्याला आवश्यकता आहे अशाला दान करणे, ह्या कल्पनेत समाजविकास आहे.

दुसरे ऋण म्हणजे ऋषिऋण. स्वतः ज्ञानप्राप्ती करून दुसऱ्यास ते शिकविणे. असे कर्म केल्याने ऋषिऋणातून मुक्ती मिळते. अशा प्रयत्नातून पुन्हा व्यक्तिविकास व समाजविकास अभिप्रेत आहे.

तिसरे ऋण म्हणजे पितृऋण. ह्यात समाजसंवर्धनाची कल्पना आहे. पण समाजसंवर्धनात सामाजिक मूल्यांच्या संवर्धनाचा सुद्धा विचार आहे. म्हणून जो आपल्यापेक्षा सरस अशी पुत्रप्राप्ती करून संस्कारक्षम पुत्र समाजाला देतो, तेव्हाच पितृऋणातून त्यास मुक्ती मिळते. म्हणजेच ऋणमुक्तीच्या धर्मकल्पनेतून व्यक्तिविकास व समाजविकासही साधला जातो.

तसेच आपल्या हिंदुधर्मात चार पुरुषार्थाची संकल्पना मांडली आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे ते चार पुरुषार्थ. पैकी धर्म, अर्थ, काम ह्या पुरुषार्थांच्या प्राप्तीमध्ये व्यक्ती व समाज ह्या दोहोंच्या विकासाचा योग्य विचार झाला आहे. ह्या तीनही पुरुषार्थांच्या प्राप्तीने व्यक्तिविकास व समाजधारणा होते. मोक्ष हा चौथा पुरुषार्थ आत्मविकासाशी जास्त निगडित असला तरी अशा व्यक्ती शेवटी लोककल्याणार्थच जास्त कार्यरत असतात. हिंदुधर्मात समाजधारणेचा व व्यक्तिविकासाचा अशा दोघांचाही विचार झालेला आहे. म्हणजे आपल्या हिंदुधर्मपालनात व्यक्तिविकास व समाजविकास हे दोन्ही अपेक्षित आहेत.

थोडक्यात धर्माचरणाने ''मी लोकांसाठी '' ह्या कल्पनेचा विचार प्रत्येकात रुजविला जातो व असा विचार समाजातील बहुतांशी लोकांत रुजला की लोकसंग्रह सहज-सुलभ होतो. लोकसंग्रह झाला की समाजोन्नत्ती शक्य असते. धर्माचरणाने अशा पद्धतीचा लोकसंग्रह जरी सहज-सुलभ असला तरी लोकसंग्रह करण्याचे चांगले गुण असलेले लोकही आवश्यक असतात. चांगले गुण म्हणजे काय याचा विचार व विचारानंतर चिंतन आणि मनन आवश्यक आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी ह्या विषयावर बरेच विवेचन करून लोकसंग्रह करणाऱ्या महंताची कल्पना, आपल्या दासबोध-ग्रंथात मांडली आहे. श्रीसमर्थांना अभिप्रेत असणारा महंत, लोकसंग्रह करणारा, धर्माचरण करणारा, समाजातील व्यक्तींना मार्गदर्शन करणारा, त्यांच्यावर प्रेम करणारा आहे.

तो अत्यंत निःस्पृह आहे, विरक्त आहे, निःस्वार्थी आहे. ईश्वरावर पूर्ण श्रद्धा असणारा आहे. धर्मपालन व धर्माचरण म्हणजे काय? याचा अभ्यास असणारा आहे. सगळे लोक सुखी असावेत अशी मनोधारणा असणारा आहे. तो समाजाला 'आदर्श' असा आहे. उद्योगशील असून दुसऱ्यासाठी स्वशरीर झिजविणारा आहे. दुसऱ्याच्या दुःखाने दुःखी होणारा व दुसऱ्याच्या सुखाने स्वतः सुखी होणारा आहे. जेथे कोणाचे काही उणे पडेल तेथे दुसऱ्यास सहाय्य करण्यास पुढे सरसावणारा आहे. दुसऱ्याला न दुखावता त्याला शहाणे करून सोडणारा आहे. धर्म म्हणजे काय? हे समजावून घेऊन, दुसऱ्याला समजावून सांगणारा आहे. जसे बोलतो तसे वागणारा आहे. स्वतः आधी प्रचिती घेऊन मगच लोकांना शिकविणारा आहे. तो अखंड सावधान आहे. धर्मध्येयाने राजकारण करणारा आहे. लोकसंग्रह करण्याची कुशलता त्याच्यात आहे. स्वतः जरी लोकसंग्रह व लोककल्याणाचे काम करीत असला तरी ते ईश्वरी कार्य आहे, असेच मानणारा आहे.

आत्मज्ञान व वैराग्य ह्या दृष्टीने स्वतःचा विकास करण्याची इच्छा असणारा आहे व तशा स्वविकासाच्या दृष्टीने प्रयत्न करणाराही आहे. लोककल्याणाच्या अनेक मार्गांना व उपायांना शोधून काढणारा आहे.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या दृष्टीने महंताच्या जीवनात प्रपंच आणि परमार्थ, अध्यात्म आणि व्यवहार, उपासना आणि उपकार ह्यांचा मोठा समतोल संवाद आणि सुरेख संगम आढळला पाहिजे. ते म्हणतात,

''लोकसंग्रह करणाऱ्याने म्हणजे त्यांच्या महंताने फार उपाधी वाढवू नयेत, पण उपाधीशिवाय राहू नये. फार काळ लोकांत राहू नये, पण सारखे एकान्तातही असू नये. फार कर्मठ असू नये पण अगदी कर्महीनही असू नये. आपल्या मनाची अवस्था सहज प्रकट करू नये पण तिच्याबद्दल संपूर्ण मौन धरू नये.''

समाजाचे नेतेपण स्वीकारणे हा एक धकाधकीचा मामला आहे. तो पार पाडण्यास एका विशिष्ट प्रकारची मनोरचना आवश्यक असते. त्या विशिष्ट मनोरचनेचा अभ्यास व आचार आवश्यक आहे.

श्रीसमर्थ म्हणतात -

**धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।**
**नाना बुद्धि शक्ताला । म्हणोनि सिकवाव्या ॥**

महंताचे जीवन म्हणजे धकाधकीचा व्यवहार आहे. देहाने, पण विशेषतः मनाने व वृत्तीने जो अशक्त आहे त्याला तो व्यवहार निभत नाही. म्हणून जो शरीराने व मनाने बलवान आहे त्याला नाना प्रकारच्या युक्त्या, नाना प्रकारचे विचार आणि नाना प्रकारचे कौशल्य शिकवावे.

**व्याप होईल तों राहावें । व्याप राहातां उठोन जावें ।**
**आनंदरूप फिरावें । कोठें तऱ्हीं ॥**

कार्याचा व्याप जोपर्यंत आपण सांभाळू शकतो तोपर्यंत लोकसमुदायात राहावे. ते अशक्य झाले की तेथून उठून चालते व्हावे. मग आनंदाने कोठेतरी परिभ्रमण करत फिरावे.

**उपाधीपासूनी सुटला । तो निःस्पृहपणें बळावला ।**
**जिकडे अनकूळ तिकडे चालिला । सावकास ॥**

जो उपाधीतून मोकळा होतो त्याची निःस्पृहता मजबूत होते. मग त्याला ज्या ठिकाणी अनुकूल परिस्थिती असेल त्या ठिकाणी तो स्वस्थपणे जाऊ शकतो.

**कीर्ति पाहतां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ।**
**केल्याविण कांहीच नाहीं । कोठें तऱ्हीं ॥**

कीर्ती पाहिजे असेल तर सुखासीनता चालणार नाही आणि सुखासीनता हवी असेल तर कीर्ती मिळणार नाही. माणूस कोठेही जावो, आपण केल्यावाचून कार्य घडत नाही असे आढळते.

**येरवीं काय राहातें । होणार तितुकें होऊन जातें ।**
**प्राणीमात्र अशक्त तें । पुढे आहे ॥**

आपण केले नाही तर कार्य अडून राहते असे नाही. जे होणार असते ते होऊन जातेच. शक्तिहीन व सामर्थ्यहीन मनुष्यप्राणी मात्र नेहमी निमित्ताला पुढे असतो.

**आधींच तकवा सोडिला । मधेंचि धीवसा सांडिला ।**
**तरी हा संसार सेवटाला । कैसा पावे ॥**

कार्य करताना आधीच उत्साह सोडला, किंवा मधेच धीर सुटला तर हा संसार शेवटापर्यंत निभावणे कठीण आहे.

**ऐसा याचा जिनसाना । पाहतां कळो येतें मना ।**
**परंतु धीर सांडावाना । कोणी येकें ॥**

संसाराचा मामला हा असा अशाश्वत आहे, त्याचे नीट निरीक्षण केले की ते मनाला समजते व पटते. हे जरी खरे तरी कोणी धीर सोडू नये.

**धीर सांडिता काय होतें । अवघें सोसावें लागतें ।**
**नाना बुद्धि नाना मतें । शाहाणा जाणें ॥**

धीर सोडल्याने काही फायदा होत नाही. माणसाला सोसायचे ते सर्व सोसावेच लागते. नाना प्रकारचे विचार आणि नाना प्रकारची मते शहाणा माणूस जाणतो.

# लोकनेत्यास समर्थांची शिकवण

श्रीसमर्थांनी महंताने किंवा लोकसंग्राहकाने ज्यांचे चिंतन, मनन करणे आवश्यक आहे अशा पुष्कळ गोष्टींचे विवरण दासबोधात केले आहे. त्यांतील काहींचा येथून पुढे विचार केला आहे.

**(१) परिभ्रमण –**

समर्थ स्वतः नित्य नवीन ठिकाणी जात असत. नवनवीन लोकांना भेटत असत. चर्चा करीत असत. नाना प्रकारच्या लोकांशी संबंध आल्याने देशस्थिती, समाजस्थिती इ. माहिती करून घेत असत.

**नित्यनूतन हिंडावें । उदंड देशाटन करावें ॥**

एके ठिकाणी बसून लोकसंग्रह होणार नाही. सावधपणे पुष्कळांना भेटावे. विशेषतः समाजात जे छोटे छोटे लोकसंग्रह (Groups) आहेत, त्यांच्या प्रमुखांना भेटावे. त्यांना आपल्या कार्याची माहिती द्यावी. त्यांना जर आपल्या कार्याचे महत्त्व पटले तर त्यांच्याबरोबरचे लोकसुद्धा आपल्या कार्याचा विचार करू शकतात. हा विषय समजावून सांगताना समर्थांनी लिहिले आहे.

**येके ठाईं बैसोन राहिला । तरी मग व्यापचि बुडाला ।**
**सावधपणें ज्याला त्याला । भेटि द्यावी ॥**

**याकारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य ।**
**येणेकरितां असंख्य । बाजारी मिळती ॥**

येथे बाजारी ह्या शब्दाचा अर्थ अनुयायी असा घ्यावा.

एखाद्या नवीन गावात आपण आपले काम करण्याच्या दृष्टीने राहावयास गेलो असता तेथील वरिष्ठांना भेटलो तर इतरांचा त्रास होणार नाही किंवा तेथे काम करणे सुलभ होते. गावातील वरिष्ठांची भेट घेतली नाही तर आपल्याला कोणी मानीत नाही. आपले महत्त्व कमी होते व आपण ज्या कामाकरिता जातो ते काम कित्येक वेळा यशस्वी होणे कठीण जाते.

वरील विषय समजावून सांगताना समर्थ म्हणतात,

**कोणी येके ग्रामीं अथवा देसीं । राहणे आहे आपणासी ।**
**न भेटतां तेथिल्या प्रभूसी । सौख्य कैंचें ॥**
**म्हणौनि ज्यास जेथें राहाणे । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें।**

**म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ।**
**प्रभूची भेटी न घेतां । तेथे कैंचि मान्यता ।**
**आपुलें महत्त्व जातां । वेळ नाहीं ॥**
**म्हणौनि रायापासूनि रंक । कोणी येक तरी नायेक ।**
**त्यास भेटणे हा विवेक । विवेकी जाणती ।**
**या कारणे जो शाहाणा । तेणें प्रभूसी भेटावें जाणा ।**
**ऐसें न करतां दैन्यवाणा । संसार त्याचा ॥**

येथे प्रभू याचा अर्थ त्या गावचा वरिष्ठ धरावा.

समर्थ पुढे म्हणतात -

**ठाईं ठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ।**
**प्राणीमात्र बोलवावा । आप्तपणें ॥**

कोणत्याही गावात लोकसंग्रहाच्या कामाकरिता जाण्यापूर्वी तेथील लोक कसे आहेत ह्याचा शोध घेऊन ठेवावा. धर्मनिष्ठ कोण, धर्मभ्रष्ट कोण, वाचाळ कोण, कार्यकर्ते कोण, दांभिक कोण, निष्ठावंत कोण, केवळ स्वार्थ पाहणारे कोण, परमार्थ पाहणारे कोण? इत्यादींची माहिती करून घ्यावी आणि मगच गावात प्रवेश करावा. तेथे गेल्यावर आपल्याला तेथील लोकांविषयी असलेली माहिती लोकांच्या प्रत्ययास आणून न देता सर्वांचाच गौरव करीत संपर्क साधावा.

**दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रकट न करावे ।**
**सज्जनापरीस आळवावे । महत्त्व देउनीं ॥**

दुर्जनाला दुर्जन म्हटल्याने आपणांस काही फायदा होत नाही. त्याला आपण फक्त ओळखून ठेवावे. परी ते प्रगट न करावे.

समर्थ संप्रदायातील महंताला भरपूर हिंडावे लागे. ज्याला मोठ्या प्रमाणावर लोकसंग्रह करावयाचा आहे त्याला एका जागी बसून कसे चालेल? तर असे हिंडताना उदरनिर्वाह कसा करावा? अशी पंचाईत पडू नये, म्हणून ''भिक्षा मागणे'' हे एक समर्थसंप्रदायाचे लक्षण ठरविले गेले.

समर्थ-काळी भिक्षा मागत असताना महंत घरोघरी जात असत.

**कुग्रामें अथवा नगरें । पहावीं घरांची घरें ।**
**भिक्षामिसें लहानथोर । परीक्षून सोडावीं ॥**

अशा पद्धतीचा विचार, भिक्षा मागण्याची पद्धत संप्रदायामध्ये सुरू

करताना, समर्थांनी केला होता. केवढा मोठा विचार आहे. घरात कोण कोण लोक असतात? त्या सर्वांचे वयोमान काय? आपल्या संप्रदायाच्या कामाला उपयोगी पडतील अशी काही मंडळी त्या घरात आहेत का? घरात धर्मपालन कित्ती चालते? राष्ट्राचाही विचार करू शकतील अशी कोण कोण मंडळी आहेत? आपल्या कार्याच्या दृष्टीने स्वार्थी विचार ठेवून नवीन घरी जावे.

**कांहीं भिक्षा आहे म्हणावे । अल्पसंतोषी असावें ।**
**बहुत आणिता घ्यावें । मुष्टि येक ॥**

कार्याच्या दृष्टीने जरी स्वार्थी विचार ठेवला तरी भिक्षेच्या दृष्टीने अल्पसंतोषी असावे. घरच्या माईने जरी पुष्कळ धान्य झोळीत टाकावयास आणले तरी एक मूठभरच त्यातून घ्यावे, असे समर्थांनी सांगितले आहे.

**(२) अखंड विवेक –**

दुसरे महत्त्वाचे सूत्र म्हणजे ''अखंड चाळणा'' – अखंड विवेक केला पाहिजे. परिभ्रमण करून लोकस्थितीचे ज्ञान त्याने जे मिळविले आहे त्याचा पूर्ण उपयोग करता आला पाहिजे. आपल्या धर्मकार्यास उपयोगी पडणाऱ्यांना ताबडतोब कार्यात गुंतविण्यास सुरुवात केली पाहिजे. ''उद्यापासून आरंभ करू'' असे कधी म्हणू नये.

**आपणांस जें जें अनुकूळ । तें तें करावें तात्काळ ।**
**होईना त्यास निवळ । विवेक उमजावा ॥**

अजून एक गमतीदार पण महत्त्वाची गोष्ट समर्थांनी सांगितली.

**ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास ।**
**तेणें अखंड सावकाश । येकांत सेवावा ॥**

येथे उदास याचा अर्थ वैराग्यगुण असलेला असा आहे. आपल्याला हे कोडे वाटते. ज्याला समुदायाचा हव्यास असेल त्याने एकान्त सेवावा. ह्याचा अर्थ असा की लोकसंग्रह करण्यास कोणते उपाय योजावेत याचा विचार एकान्तात बसून शांतपणे करावा.

कोणतेही अवघड व महत्त्वाचे कार्य करावयाचे असल्यास, त्याची चाळणा करावी म्हणजे सांगोपांग विचार करावा आणि असा सांगोपांग विचार करण्याकरिता एकान्तात बसावे.

**अखंड तजवीजा चाळणा जेथें । पाहातां काय उणें तेथें ।**
**येकांतेविण प्राणियांतें । बुद्धी कैंची ॥**

**(३) प्रयत्नवाद –**

लोकसंग्रहार्थ समर्थांची तिसरी शिकवण म्हणजे लोकसंग्रह करणाऱ्या जवळ अखंड प्रयत्न करण्याचा मनाचा निग्रह पाहिजे.

दासबोध अभ्यासकाला लक्षात येते की समर्थ, प्रयत्नवाद फार प्रखरपणे मांडतात.

उद्योगावाचून स्वस्थ बसून केवळ परमेश्वरावर हवाला टाकून कार्य साधेल असे त्यांनी केव्हांही सांगितले नाही.

**बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजाभोवानी ।**
**परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ॥**

समर्थांनी शिवछत्रपतींना उद्देशून, विशेषप्रसंगी अशी वरील ओवी लिहिली असणार.

''ईश्वराने व विशेषतः देवी तुळजाभवानीने तुमचा पत्कर घेतला आहे. ती तुम्हांस अंगीकृत कार्यात यश देईल. तथापि तुम्ही आपल्याकडून जे प्रयत्न करणे आवश्यक आहे ते विचाराने, विवेकाने केलेच पाहिजेत.'' केवळ ईश्वरावर न सोडता, परमेश्वर काळजी घेईल असे म्हणून प्रयत्न न करता गप्प बसणे समर्थांना मान्य नव्हते.

तरीपण परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा आवश्यक. जे कार्य करतो आहोत, ते ईश्वरी कार्यच आहे हा निश्चय करून अखंड व कठोर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

एकदा श्रीसमर्थांना शिष्यांनी प्रश्न केला की या जगात भेद का दिसून येतात? एक संपन्न का? आणि दुसरा विपन्न का? एक निर्मळ तर दुसरा ओंगळ. एक राव तर दुसरा रंक. एक उत्तम तर दुसरा अधम. एक सुखी तर दुसरा दुःखी ?असा भिन्न भिन्न प्रकार का असावा? समर्थांनी याचे उत्तर ''प्रारब्ध'' असे न देता, ते म्हणतात,

**हे सकळ गुणापासी गती । सगुण भाग्यश्री भोगिती ।**
**अवगुणास दरिद्रप्राप्ती । येदर्थी संदेह नाहीं ।**

श्रीमंत होणे किंवा दरिद्री राहणे हे आपल्या गुणावरच अवलंबून असते. आपल्या अखंड व कठोर प्रयत्नावरच अवलंबून असते.

**आपलें स्वहित न कळे जना । तेणें भोगिती यातना ॥**
**म्हणोन आळस सोडावा । येत्न साक्षेपें जोडावा ।**
**दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥**

असा प्रयत्न करण्याविषयीचा उपदेश करून शेवटी समर्थ उलट विचारतात की,

**घालून अकलेचा पवाड । व्हावें ब्रह्मांडाहून जाड ।**
**तेथें कैंचें आणिलें द्वाड । करंटपण ॥**

मनात आणले तर साऱ्या ब्रह्मांडाचे आकलन करण्याची शक्ती मनुष्यात असता त्याच्या ठिकाणी करंटेपण का असावे?

**व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।**
**तेणें प्राणी सदेव होती । देखत देखता ॥**

समर्थ म्हणतात, तुम्हीच पाहाना, तुमच्या डोळ्यादेखत, ''देखत देखता'' तुमचे शेजारीपाजारी, तीसचाळीस वर्षांत वैभवाचे शिखर गाठतात. का? तर ते ''व्याप आटोप करिती ।'' त्यांचा कामाचा पसारा वाढवितात आणि ''धके चपेटे सोसिती'' म्हणून,

वरील एकंदर विवेचनात सदैव प्रयत्नांचीच अपेक्षा दर्शविली आहे.

**कष्टेंविण फळ नाहीं । कष्टेविण राज्य नाहीं ।**
**केल्याविण होत नाहीं । साध्य जनीं ॥**

ईश्वरावर हवाला टाकून स्वस्थ बसण्याकडे मनाची जी प्रवृत्ती आजकाल दिसते तिला ह्या ओवीत आधार सापडत नाही. प्रयत्नाला कंटाळून चैनीत काळ कंठणे हा पुरुषार्थ नाही.

**येहलोक अथवा परलोक । दोहीकडे सारिखाचि विवेक ।**

प्रपंचातील सुस्थिती असो किंवा परमार्थातील मुक्ती असो, अखंड कष्टावाचून म्हणजे कठोर प्रयत्नांशिवाय ती प्राप्त होणार नाही.

दुसऱ्याच्या मदतीची आशा धरून प्रयत्न सोडणाऱ्याला समर्थांनी मूर्खात काढले आहे.

**जो दुसऱ्यावरि विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।**
**जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥**
**जेहिं उदंड कष्ट केले ते भाग्य भोगून ठेले ।**
**येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥**

वरील दोन्ही ओव्या आचरणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत.

''करी थोडे बोले फार'' तो मूर्ख समजावा असे समर्थ म्हणतात. नुसती वटवट करण्यास समर्थांचे अनुमोदन नाही. ते म्हणतात

**उगीच करिती बडबड । परी करून दाखविणें हें अवघड।**
**परस्थळ साधणें जड । कठिण आहे ॥**

काय व्हायचे असेल ते होईल, असे मानून नशिबावर हवाला टाकून स्वस्थ बसणे हे शहाणपणाचे लक्षण नव्हे. ललाटरेषा देखील प्रयत्नांनी पालटता येते असे समर्थांचे म्हणणे आहे.

**रेखा तितुकी पुसोनि जाते । प्रत्यक्ष प्रत्यया येतें ।**
**डोळे झांकणी करावी ते । काये निमित्य ॥**

प्रयत्नवादाची येथे सीमा झाली. अशी ही प्रयत्नवादाची शिकवण आहे.

**(४) कीर्तीची हाव नसावी –**

समर्थांनी लोकसंग्रह करणाऱ्याला दिलेली शिकवण म्हणजे त्याला कीर्तीची हाव नसावी. पण चाड जरूर असावी.

कीर्तिसाठी म्हणून कार्याला प्रवृत्त होऊ नये. तर निःस्पृहपणे कर्तव्याला सुरुवात केली पाहिजे. निरपेक्षपणे कर्तव्य बजावले म्हणजे नको म्हणत असतानाही कीर्ती मागे लागते. कीर्ती फुकटची मिळत नाही.

**झिजल्यावाचून कीर्ति कैंची । मान्यता नव्हे की फुकाची॥**

स्वस्थ आरामशीर पडून राहून जर कीर्तीची माळ गळ्यात पडती तर मग आज बरेच कीर्तिरूप झालेले दिसले असते. अतिशय कष्ट घेतल्याशिवाय कोणासही सहज कीर्ती प्राप्त होत नाही. सुखावर पाणी सोडल्याशिवाय कीर्तीची प्राप्ती होत नाही.

**कीर्ति पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहातां कीर्ति नाहीं ।**
**कीर्ति करून नाहीं मेले । ते उगेच आले आणि गेले ।**
**शाहाणे होऊन भुलले । काय सांगावे ॥**

कर्तव्याला जागले पाहिजे. नुसता बायकापोरांचा संसार करू नका, तो कोणीही करतो. विशेष म्हणजे स्वधर्माचरण करून नाव मिळवून कीर्ती मागे राहील असा प्रयत्न करावा.

**(५) विरक्ती –**

शाश्वत व नाशवंत म्हणजे काय? हे समजावून घेतले पाहिजे. ज्या गोष्टी कायम सुख देऊ शकतील त्या मिळविण्याची धडपड योग्य होईल. पण ज्या क्षणिक सुख देतात त्यांच्याकरिता आवश्यकतेपेक्षा जास्त मेहनत मनुष्य काही वेळा घेतो.

**येथील येथें अवघेंचि रहातें । ऐसें प्रत्ययास येतें ।**
**कोण काय घेऊन जातें । सांगाना कां ॥**

हा विचार लक्षात ठेवून विषयाबद्दल म्हणजे वासनांबद्दल वैराग्य निर्माण होईल असे प्रयत्न करणे आवश्यक. जो विरक्त असेल तोच काही महत्त्वाची व मोठी समाज कार्ये करू शकेल. म्हणून लोकसंग्रह करणाऱ्याजवळ विरक्ती हा गुण असणे महत्त्वाचे. नुकतीच एक गोष्ट प्रसिद्ध झाली आहे. भारतातील सर्वात छोट्या प्रांतातील सर्व मंत्र्यांनी गेल्या वर्षभरात राहत्या घरावर केवळ रंगसफेतीकरिता समाजाचा किती पैसा वापरला ते त्या बातमीत आले आहे. एका मंत्र्याने घराला रंगसफेती करण्याकरिता नऊ लाख रुपये समाजाचे खर्च केले तर त्याच मंत्रिमंडळातील दुसऱ्या मंत्र्याने केवळ अठराशे रुपये खर्च केले. नऊ लाख रुपये खर्च करणारा बरीच वर्षे राजकारणात आहे, तर अठराशे रुपये खर्च करणारा एका निःस्वार्थी संघटनेचा कार्यकर्ता आहे आणि मंत्रिमंडळात अजून नवीन आहे. त्याच्यातील वैराग्य अजून जागृत आहे. कारण केवळ अठराशे रुपयांतील रंगसफेती त्याला मंत्री असूनसुद्धा पुरु शकते.

तात्पर्य, लोकसंग्रह करणाऱ्याच्या ठिकाणी वैराग्याचा भाव असावयास पाहिजे. एरवी त्याच्या हातून लोकसंग्रह व्हावयाचा नाही. ज्याने स्वार्थाचा त्याग केला नाही, त्याने लोकसंग्रहाच्या कामात यश मिळेल अशी आशा धरू नये.

**(६) निःस्पृहता –**

समर्थ पुढे म्हणतात, नुसताच वैराग्यभाव उपयोगाचा राहणार नाही. त्याबरोबर त्याच्याजवळ निःस्पृहताही आवश्यक आहे.

**उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळीत अवघेंचि टाकावें ।**
**निःस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥**

निःस्पृहतेच्या आचरणाविषयीचा उपदेश समर्थांनी त्यांच्या शिष्यांना करताना म्हटले आहे की,

**मोलें कीर्तन करूं नये । कोठेंतरी ॥**

म्हणजे मानधन ठरवून किंवा ते मिळण्याच्या आशेने त्याने कीर्तन करू नये. इतकेच नव्हे तर

**दिल्या द्रव्य घेऊं नये ॥**

थोडक्यात समाजकार्य करण्याचा एका बाजूने डांगोरा पिटावयाचा व दुसऱ्या बाजूने त्याचे मोल घ्यावयाचे हे योग्य नाही. नीतिमत्तेच्या दृष्टीने, धर्मपालनाच्या दृष्टीने, लोकसंग्रह करणारा सामाजिक नेता लोकांच्यापेक्षा, निःस्पृहतेच्या व वैराग्याच्या दृष्टीने वरच्या पायरीवर असणे आवश्यक आहे. समर्थ पुढे म्हणतात,

**निःस्पृहता धरो नये । धरिली तर सोडूं नये ।**
**सोडिली तर हिंडो नये । वोळखीमधें ॥**

म्हणजे आधी निःस्पृहता धरू नये. पण एकदा धरली तर मात्र कधी सोडू नये (कारण त्याने त्याचे समाजात हसे होईल, त्याची विश्वासार्हता कमी होईल) आणि ती जर सोडली तर ओळखीच्या लोकांत वावरू नये.

**कांता दृष्टी राखो नये । मनास गोडी चाखऊं नये ।**
**धारिष्ठ चळतां दाखवूं नये । मुख आपुलें ॥**

''धारिष्ठ चळतां'' याचा अर्थ मनःसंयमन सुटले, असा घ्यावा. बाकी जास्त विवरणाची आवश्यकता इष्ट नसली तरी ओवी महत्त्वाची आहे.

**येके स्थळी राहों नये । कानकोंडे साहो नये ।**
**द्रव्यदारा पाहूं नये । आळकेपणे ॥**

एका ठिकाणी फार राहू नये. कोणाचे मिंधेपण सहन करू नये. पैसा आणि बायका यांच्याकडे आशाळभूत होऊन पाहू नये.

**आचारभ्रष्ट होऊं नये । दिल्या द्रव्य घेऊं नये ।**
**उणा शब्द येऊं नये । आपणावरी ॥**
**भोगी मन असो नये । देह दुःखे त्रासो नये ।**
**पुढें आशा धरूं नये । जीवित्त्वाची ॥**
**विरक्ती गळो देऊं नये । धारिष्ठ चळो देऊं नये ।**
**ज्ञान मळिण होऊं नये । विवेक बळें ॥**
**पोटीं चिंता धरूं नये । कष्टें खेद मानूं नये ।**
**समईं धीर सांडूं नये । कांहीं केल्या ॥**

**शुद्ध मार्ग सोडूं नये । दुर्जनांसी तंडो नये ।**
**समंध पडो देऊं नये । चांडाळासी ॥**
**नित्यनेम सांडू नये । अभ्यास बुडो देऊं नये ।**
**परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥**
**स्वतंत्रता मोडूं नये । निरापेक्षा तोडूं नये ।**
**परापेक्षा होऊं नये । क्षणक्षणा ॥**
**थोरपणें चुको नये । न्याये नीति सांडो नये ।**
**अप्रमाण वर्तो नये । कांही केल्या ॥**
**सावधपण सोडो नये । व्यापकपण सांडूं नये ।**
**कदा सुख मानूं नये । निसुगपणाचे (आळसाचे) ॥**
**हे सिकवण धरितां चित्तीं । सकळसुखें वोळगती ।**
**आंगीं बाणे महंती । अकस्मात ॥**

समर्थांनी निःस्पृहतेवर शंभराहून जास्त ओव्या लिहिल्या आहेत. त्यातून त्यांच्या शिष्यांना उपदेश केला आहे. पैकी केवळ तेराच वर दिल्या आहेत.

समर्थांनी सांगितलेल्या निःस्पृहतेविषयीच्या बहुतांशी सूचना कुणास अंगिकारता आल्या तर असा संपन्न नेता समाजाला लाभणे म्हणजे या समाजाचे मोठे भाग्यच.

**(७) मृदुवचन -**

लोकसंग्रह करणारा, लोकांना हवाहवासा वाटला पाहिजे. त्याकरिता त्याने काही गुण आत्मसात करणे आवश्यक आहे. नम्र बोलणे व मृदू बोलणे हे त्याचे सूत्र

**जगामध्ये जगमित्र । जिव्हेपाशी आहे सूत्र ॥**

आपल्याला जर लोकांना एकत्र आणून लोकसंग्रहाच्या दृष्टीने प्रयत्न करावयाचे असतील तर,

**सकळासी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ।**
**मृदुवचनें बोलत जाणें । कोणी येकासीं ॥**

तसे केले नाही तर लोक आपल्याजवळ येणार तरी कसे? म्हणून कठोर वचनाचे बोल उपयोगाचे नाहीत.

**नानाजनांचें हृदय । मृदू शब्दें उकलावें ॥**
**उंचनीच म्हणो नये । सकळांचे निववावें हृदय ॥**

सर्वांना आपल्या मृदू वचनाने निववावे म्हणजे शांत करावे, आल्हादित करावे. कोण केव्हा कामास येईल त्याचा नेम नसतो. म्हणून थोर असोत, लहान असोत, महंताने सर्वांशीच मृदू बोलून प्रेमळ वर्तन ठेवावे.

**मृदू बोलता सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।**
**आत्मवत पहावें तें । मानीत जावें ॥**
**कठीण शब्दें वाईट वाटतें । हें तों प्रत्ययास येतें ।**
**तरीमग वाईट बोलावें तें । काय निमित्यें ॥**

**(८) क्षमा शांतियुक्त आचरण –**

महंताचे मृदुवचन असावे तसेच त्याचे आचरण क्षमा आणि शांतियुक्त असावे.

**अन्यायें थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावें ।**

त्याच्या ठिकाणी राग नसावा. रागाच्या योगाने मित्र देखील शत्रू बनतात असा अनुभव आहे.

**म्हणून कदा रागासि न यावें । क्षमारूपें ॥**

राग येण्यासारखे प्रसंग वारंवार येतात. त्या वेळी त्याने शांत असणे आवश्यक आहे.

**उदंड धिक्कारून बोलती । तरी चळो नेदावी शांती ।**
**दुर्जनास मिळोन जाती । धन्य ते साधु ॥**

दुसऱ्याने धिक्कार केला म्हणून महंताची शांती का ढळावी? ज्याला मानापमानाचे महत्त्व असते त्याची शांतीमात्र लवकर ढळू शकते. पण समर्थ लागलीच ''कांहीं मान इच्छूं नये । कोठेंतरी॥'' असेही शिकवतात. मग दुसऱ्याने आपला धिक्कार केल्याचे सुख-दुःख कोठे उरले? कारण समर्थ म्हणतात,

**धिक्कारल्या धिक्कारेना । तोचि महापुरुष ।**

म्हणून महंताच्या ठिकाणी सहिष्णुता सुद्धा पाहिजे.

**स्वयें आपण कष्टावें । बहुतांचे सोसित जावें ।**
**झिजोनि कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें ॥**

**(९) परोपकार –**

शेवटी समर्थांनी महंताची वृत्ती परोपकारी असली पाहिजे असे

सांगितले आहे.

**शरीर परोपकारी लावावें । बहुतांच्या कार्यास यावें ।**
**उणे पडो नेदावें । कोणी येकाचें ॥**
**जितुकें कांहीं आपणासि ठावें । तितुकें हळूंहळूं सिकवावें ।**
**शहाणे करूंन सोडावें । बहुतजन ॥**

महंताचे वर्णन करताना समर्थ एके ठिकाणी म्हणतात,

**तो परोपकार करिताचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।**
**मग काय उणे तयाला । भूमंडळीं ॥**

आतापर्यंत महंत होण्यास आवश्यक अशा काही गुणांची आपण ओळख करून घेतली. असे गुण ज्याने आत्मसात करून घेतले आहेत, त्याला उद्देशून समर्थ म्हणतात,

**जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष माहा भला ।**
**कित्येक लोक त्याला । शोधीत फिरती ॥**
**मनापासून भक्ती करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।**
**तया माहापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥**
**ऐसा जो माहानुभाव । तेणें करावा समुदाव ।**
**भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥**
**आमची प्रतिज्ञा ऐसी । काही न मागावें शिष्यासी ।**
**आपणामागें जगदीशासी । भजत जावें ॥**

वर सांगितलेल्या उत्तम गुणांनी जो शोभून दिसतो तोच खरा थोर पुरुष होय. अशा पुरुषाला लोक शोधीत फिरतात.

जो अगदी मनापासून भगवंताची भक्ती करतो आणि अगदी अगत्याने उत्तम गुणांचा अभ्यास करतो, तो खरा थोर पुरुष असतो. अशा थोर पुरुषाला लोक शोधीत येतात.

असा जो थोर स्वानुभवी पुरुष असेल त्याने लोक एकत्र आणून त्यांचे पुढारीपण करावे. लोकांना भक्तीच्या मार्गास लावून भगवंत आपलासा करून द्यावा.

आपण आपल्या शिष्याजवळ काहीही मागावयाचे नाही अशी त्याची प्रतिज्ञा असते तरी देखील तो एक गोष्ट मागतो; ती ही की, आपल्या पश्चात् शिष्यांनी भगवंताची भक्ती चालू ठेवावी.

## राजकारण

धर्मसंस्थापना लक्षात ठेवून समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालण्यासाठी, समाजधुरिणांनी व राजकीय पुढाऱ्यांनी करावयाच्या आवश्यक अशा सर्व गोष्टी राजकारण ह्या शब्दात अभिप्रेत आहेत.

ह्यासाठी व्यापक उलाढाली कराव्या लागतात. बहुत लोकांस चालवावे लागते. नाना मंडळींना हलवावे लागते. अखंड तजविजा - चाळणा कराव्या लागतात. समुदाय एकविचारे भरावे लागतात, आणि समाजातील भिन्न प्रकृतीची, भिन्न पातळीवरची, भिन्न आवाक्याची माणसे एकत्र आणून कामे करवून घ्यावी लागतात. ह्या सर्व विषयांचा विचार राजकारणात येतो. हे सर्व कौशल्याने व चातुर्याने करावे लागते. सावधानतेने करावे लागते.

आणि हे सर्व साध्य करण्याकरिता काळजी घ्यावी लागते. श्रीसमर्थ म्हणतात,

**इशारतीचे बोलो नये। बोलायचे लिहो नये।**
**लिहावयाचे सांगो नये। कांही केल्या॥**

श्रीसमर्थ पुढे म्हणतात जो ज्ञानी आहे, अगदी निष्काम आहे, तसेच धनेषणा, लोकेषणा, दारेषणा यांपासून जो अलिप्त आहे आणि त्याला जर लोकसंग्रहाची तीव्रतर इच्छा असेल तरच त्याने लोकसमुदाय बनवावा.

**ज्ञानी आणि उदास। समुदायाचा हव्यास।**
**तेणें अखंड सावकाश। एकांत सेवावा॥**

लोकसमुदाय बनविण्याचा निर्णय झाल्यावर कोणते कार्य करावयाचे व ते कसे करावयाचे याचा शांतपणे, घाई न करता विचार करून योजना ठरविण्याकरिता एकान्त सेवावा.

**मुख्य हरिकथा निरूपण। दुसरें ते राजकारण।**
**तिसरे तें सावधपण। सर्व विषईं॥**

अध्यात्माची भूमिका अथवा पार्श्वभूमी हे पहिले लक्षण होय. भगवंताचा कधीही विसर पडू देऊ नये. राजकारण हे दुसरे लक्षण होय. धर्मसंस्थापना लक्षात ठेवून समाजाचे सर्व व्यवहार सुरळीत चालण्यासाठी, समाजधुरिणांनी

व राजकीय पुढाऱ्यांनी करावयाच्या सर्व गोष्टी राजकारण या दुसऱ्या लक्षणात अनुस्यूत आहेत. व्यवहार उत्तम रीतीने करण्यास लागणारे चातुर्य असावे लागते. सर्व बाबतीत सावधपण असणे हे तिसरे लक्षण होय. पुढाऱ्याचे लक्ष चौफेर पाहिजे.

**चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेप ।**
**अन्यायें थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावें ॥**

अतिशय उद्योगीपणा हे चौथे लक्षण होय. अविरत उद्योगावाचून टिकावू यश मिळत नाही. आपल्या ध्येयाबद्दल व कार्याबद्दल निघणारे नाना प्रकाराचे आक्षेप व संशय असतात. त्यांचे निरसन करावे. आपले अनुयायी लहान व मोठ्या चुका करतात, त्यांना त्याबद्दल क्षमा करावी.

**जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।**
**नीतिन्यायासी अंतर । पडोंच नेदावें ॥**

दुसऱ्याच्या मनात काय आहे ते ओळखावे. आपण आपली वृत्ती सदैव उदासीन व अलिप्त ठेवावी. आपले वागणे नीतिमूल्यांस सोडून कधीही असू नये.

**संकेते लोक वेधावा । येकून येक बोधावा ।**
**प्रपंचही सावरावा । पडोंच नेदावें ॥**

दुसऱ्याच्या मनात काय आहे ते ओळखावे. आपण आपली वृत्ती सदैव उदासीन अलिप्त ठेवावी. आपले वागणे नीतिमूल्यांस सोडून कधीही असू नये.

**संकेतें लोक वेधावा । येकून येक बोधावा ।**
**प्रपंचही सावरावा । येथानशक्त्या ॥**

प्रचितीच्या संकेताने माणूस आकर्षित करावा. तो जवळ आला म्हणजे त्याला ज्ञान देऊन शहाणा करावा. हे करीत असता आपला शक्य तेवढा प्रपंचही चालवावा.

**दोष देखोन झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।**
**दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ।**

कार्य करीत असताना दुसऱ्याचे दोष जवळून दिसतात पण त्याच्यावर पांघरूण घालावे. दुसऱ्याचे अवगुण आपल्या तोंडाने बोलून कधीही दाखवू नयेत. दुर्जन आढळल्यास त्याच्यावर उपकार करून त्यास मिंधा करून ठेवावा.

**तऱ्हें भरोंच नये । सुचावें नाना उपायें ।**
**नव्हे तेंचि करावें कार्यें । दीर्घ प्रेत्नें ॥**

उगीच तऱ्हेवाईकपणाने वागू नये. प्रसंग आला असता नाना प्रकारचे उपाय सुचवावेत. जे कार्य घडून येण्यास अशक्य दिसते ते दीर्घ प्रयत्नाने घडवून आणावे.

**फड नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सांवरावा ।**
**अतिवाद न करावा । कोणी येकासी ॥**

एका कार्यासाठी एकत्र आलेल्या लोकांचा समूह भंग पावणार नाही, रंगाचा बेरंग होणार नाही याची काळजी घ्यावी. कठीण प्रसंग आला तर धीराने निभावून न्यावा. कोणाबरोबर मर्यादेबाहेर वाद घालू नये.

**दुसऱ्याचें अभिष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।**
**न सोसे तरी जावें । दिगंतराप्रती ॥**

दुसऱ्याचे कल्याण कशात आहे ते जाणून वागावे. पुष्कळ लोकांसाठी पुष्कळ कष्ट सोसावे. असे कष्ट सोसवत नसतील तर लोकांना सोडून एकान्तात निघून जावे.

**दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकोन तरी वाटून घ्यावें ।**
**बरेंवाईट सोसावें । समुदायाचें ॥**

दुसऱ्याचे दुःख ओळखावे. ते ऐकून आपण त्यामध्ये वाटेकरी व्हावे. समूहाला सोसावे लागणारे जे दुःख असते व भोगावयाला मिळालेले जे सुख असते त्यामध्ये आपण भागीदार व्हावे.

**अपार असावें पाठांतर । सन्निधचि असावा विचार ।**
**सदासर्वदा तत्पर । परोपकारासी ॥**

खूप पाठांतर असावे. पुष्कळ ग्रंथांचे अवलोकन करावे. नेहमी विचाराने वागण्याची,विवेकपूर्वक कर्म करण्याची सवय असावी. परोपकार करण्यास केव्हाही मनापासून तयार असावे.

**शांती करून करवावी । तऱ्हें सांडून सांडवावी ।**
**क्रिया करून करवावी । बहुताकरवीं ॥**

कठीण प्रसंगी आपण शांत राहणे आणि इतरांस शांत राहण्यास शिकवावे. आपण कर्म करावे आणि इतरांकडून ते करवून घ्यावे.

**करणें असेल अपाये । तरी बोलोन दाखऊं नये ।**
**परस्परें चि प्रत्ययें । प्रचितीस आणावा ॥**

एखाद्याला अपाय करायचा असेल तर त्याची वाच्यता करू नये. आपण त्यात न सापडता दुसऱ्याकरवी तो घडवून आणावा.

**जो बहुतांचे सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ॥**
**बहुत सोसितां उरेना । महत्त्व आपुलें ॥**

जो पुष्कळांचे सुखदुःख सोशीत नाही, त्याच्याकडे पुष्कळ लोक आकर्षित होत नाहीत. पण दुसऱ्याचे किती सोसावे यालाही मर्यादा आहे. त्या मर्यादेबाहेर सोसणे हा गुण राहात नाही. कारण मग त्यामुळे आपली किंमत उरत नाही.

**राजकारण बहुत करावें । परंतु कळों च नेदावें ।**
**परपीडेवरी नसावें । अंतःकरण ॥**

राजकारण बहूत करावे आणि ते करण्यासाठी पुष्कळ गुप्त कार्य करावे लागते. ते करावे पण लोकांना कळू देऊ नये. दुसऱ्याला छळण्याचा विचार मनामध्ये कधीही नसावा.

**लोक पारखून सांडावे । राजकारणें अभिमान झाडावें ।**
**पुन्हां मेळवून घ्यावे । दुरील दोरे ॥**

माणसांची परीक्षा करून त्यास बाजूला सारावे. अभिमानी माणसांचा अभिमान मोठ्या चातुर्याने नाहीसा करावा. या कारणाने दुरावलेली माणसे पुन्हा समूहात एकत्र आणावीत.

**हिरवटासी दुरी धरावें । कचरटासी न बोलावें ।**
**समंध पडता सोडून जावें । येकीकडे ॥**

तापट व अविवेकी माणसाला दूर ठेवावे. भित्र्या व अंगचोर माणसाला आपले गुप्त बेत सांगू नयेत. अशा लोकांशी संबंध आला तर आपण दुसरीकडे निघून जावे.

**ऐसें असो राजकारण । सांगताते असाधारण ।**
**सुचित असतां अंतःकरण । राजकारण जाणे ॥**

असो. राजकारण असे असते. त्याचे समग्र वर्णन करणे शक्य नाही. ज्याचे चित्त एकाग्र होऊ शकते त्यालाच ते आकलन होते.

**पाहतां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना ।**
**आले वैभव अभिळासीना । कांही केल्यां ॥**

खरा निःस्वार्थी लोकसंग्रही पुरुष कार्य झाले की निघून जातो. त्याला शोधले तरी तो सापडत नाही. त्याचा मानसन्मान करावा म्हटले तर तो राहात नाही. इतकेच नव्हे तर चालून आलेल्या वैभवाची तो अभिलाषा धरीत नाही.

सावधपणा व धूर्तपणा ह्या दोन गुणांविषयी श्रीसमर्थ लिहितात,

**जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें ।**
**कृत्रिम अवघेंचि खुंटलें । सहज चि येणें ॥**

दुसऱ्याच्या मनात जे हेतू असतात ते जर आपल्याला आधीच समजले तर मग त्याचे कपट आपोआपच आपल्याला थांबवता येईल. श्रीसमर्थांचा समाजनेता-महंत ज्ञानी असल्याने तो प्राणिमात्रांचे अंतरंग ओळखतो. त्यामुळे कोणाच्या अंतरी काय कपट आहे ते त्यास सहजगत्या समजते.

**अखंड राहतां सलगी होते । अतिपरिचयें अवज्ञा घडते ।**
**याकारणे विश्रांती ते । घेतां नये ॥**

एकाच ठिकाणी सतत राहिल्याने सलगी वाढते. अतिपरिचय झाल्याने महंताचा मान राहात नाही. या कारणाने महंताने एकाच ठिकाणी विश्रांती घेत स्वस्थपणे राहू नये.

**आळसें आळस केला । तरी मग कारबार चि बुडाला ।**
**अंतरहेत चुकत गेला । समुदायाचा ॥**

आळसाच्या आवडीने जर कामाचा आळस केला तर मग सगळा कारभार नाश पावतो. लोकसमुदायाला मार्गदर्शन करून कार्यरत करण्याचा मनामधील हेतू तसाच राहून जातो.

**उदंड उपासनेची कामें । लावीत जावी नित्यनेमें ।**
**अवकाश कैंचा कृत्रिमें । करावयासी ॥**

नित्यनेमाने करावयाची अशी उपासनेची पुष्कळ कामे लोकसमुदायाच्या मागे लावून द्यावी. लोक त्यामध्ये गुंतून राहिले की मग लबाडी करावयाला कुणाला सवडच उरत नाही.

**चोर भांडारी करावा । घसरतां च सांभाळावा ।**
**गोवा मूर्खपणाचा काढावा । हळूं हळूं ॥**

चोरालाच भांडारावर मुख्य नेमावा. जर तो कधी घसरला, जर त्याने कधी चोरी केली तर त्याला क्षमा करून सांभाळून घ्यावा. त्याच्या मूर्खपणातून त्याला हळूहळू बाहेर काढावा.

**या अवघ्या पहिल्याच गोष्टी । प्राणी कोणी नव्हता कष्टी ।**
**राजकारणें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥**

या साऱ्या गोष्टी पूर्वीपासून चालत आल्या आहेत. कोणत्याही माणसाला त्याज्य न समजता सर्वांना राजी राखून आपल्या कार्यामध्ये खुबीने गुंतवून टाकावे.

**नष्टासी नष्ट योजावे । वाचाळासी वाचाळ आणावें ।**
**आपणावरी विकल्पाचें गोवें । पडोंच नेदी ॥**

जो नष्ट असेल त्याच्या मुकाबल्यात नष्ट आणून उभा करावा. जो वाचाळ असेल त्याच्या तोंडी दुसरा वाचाळ आणावा. आपल्यासंबंधी दुसऱ्याच्या मनात विकल्प किंवा संशय निर्माण होईल असे काहीच करू नये. आपले अलिप्तपण सांभाळून आपण वागावे.

**जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।**
**जो आपणची कष्टत गेला । तोचि भला ॥**

जो दुसऱ्यावर विश्वासून राहतो त्याचा कार्यभाग नाश पावतो. जो आपण स्वतः कष्ट करतो तोच भला होय.

**अवघ्यास अवघें कळलें । तेव्हा ते रितें पडिलें ।**
**याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे की ॥**

एखाद्या कार्याबद्दल सर्वांना सर्व गोष्टी कळल्या तर ते कार्य मागे पडते. ते नीट होत नाही म्हणून असे होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. ज्या माणसाकडून कार्याचा जेवढा भाग करून घ्यावयाचा असेल, तेवढ्यास पुरेल इतकीच माहिती त्यास द्यावी. सबंध कार्याची माहिती देऊ नये.

**मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकांकरवी करवावें ।**
**कित्तेक खलक उगवावें । राजकारणामध्यें ॥**

कार्यांचे मुख्य सूत्र आपल्या हाती ठेवावे. जे काही करावयाचे ते लोकांकडून करवून घ्यावे. आपल्या कार्याच्या व्यवहारामध्यें पुष्कळ साधी माणसे पुढे आणावी. त्यांना कार्यकर्ते बनवावे.

**बोलके पहिलवान कळकटे । तयासीच घ्यावे झटे ।**
**दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥**

जे बडबडे व भांडकुदळ बळकट पुढारी असतात त्यांच्याशी झुंज द्यावी व त्यांना पराजित करावे. दुर्जनांच्यामुळे आपले राजकारण अडून पडले असे होऊ देऊ नये.

**ग्रामण्य वर्मी सांपडावें । रगडून पीठचि करावें ।**
**करूनि मागुती सांवरावें । बुडऊं नये ॥**

गावगुंडीचे रहस्य शोधून काढावे आणि गावगुंडांना हैराण करून नरम पाडावे. त्यांना नरम केल्यावर आपलेसे करून घ्यावे. त्यांना साफ नाहिसे करू नये.

**खळदुर्जनासी भ्याले । राजकारण नाहीं राखिलें ।**
**तेणें अवघें प्रगट जालें । बरे वाईट ॥**

दुष्ट व दुर्जन यांच्या भयाने आपण राजकारण सांभाळले नाही तर राजकारणातील बरे वाईट सर्व उघड होऊन कार्याचा नाश होईल.

**तयास देखतां दुर्जन धाके । बसवी प्रचीतीचे तडाखे ।**
**बंडपाषांडाचे वाखे । सहजचि होती ॥**

तो महंत लोकनेता असा पाहिजे की त्याला पाहून दुर्जनांना भय वाटावे. तो दुर्जनांना तडाखे मारतो अशी प्रचीती पाहिजे म्हणजे मग बंडे आणि पाखंडे आपोआपच नामशेष होतात.

**हें धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।**
**ढिलेपणाच्या संभ्रमे । जाऊं नये ॥**

ही खरोखर मोठ्या चतुराईची कामे आहेत. महंताने अगदी व्यवस्थितपणे राजकारण करावे. उगीच ढिलेपणाच्या भ्रमाने वागू नये.

**कोठेच पडेना दृष्टीं । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी ।**
**वाग्विलासें सकळ सृष्टीं । वेधिली तेणें ॥**

अशा पुढारी महंताला पाहावयाला जावे तर तो कोठे दृष्टीस पडू नये. पण ठिकठिकाणी लोकांनी त्याच्याबद्दल चर्चा करावी. आपल्या उत्तम वक्तृत्वानें असा महंत सर्व लोकांना आपल्याकडे आकर्षून घेतो.

**हुंब्यासी हुंबा लावून द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।**
**लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंद ॥**

घुम्याची घुम्याशी जोड घालून द्यावी, मूर्खाशी मूर्खाची जोड घालावी, धटिंगणाशी धटिंगणाची जोड घालावी, एका धटिंगणाबरोबर दुसरा धटिंगण उभा करावा.

**धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।**
**खटनटासी खटनट । अगत्य करीं ॥**

दांडग्यासमोर दांडगा उभा करावा, उद्धटाच्या तोंडाशी उद्धट द्यावा. दुष्ट, भांडखोर दुर्जनाला तसाच दुष्ट व भांडखोर आणून भेटवावा.

**जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।**
**इतुके होते परीं धनी कोठें । दृष्टीस न पडे ॥**

अशा रीतीने जशास तसा भेटला म्हणजे मग सभेला रंग भरतो. परंतु या सर्व राजकारणाची सूत्रे हालविणारा मात्र कोठेच दृष्टीस पडू नये.

# उपसंहार

अगोदरच्या प्रकरणांतून सांगितलेल्या गुणांनी युक्त असा, लोकसंग्रह करू इच्छिणारा महंत किंवा निःस्पृह हा श्रीसमर्थांना अभिप्रेत असणारा लोकनेता आहे. लोकांना संसार व्यवस्थित करायला शिकविणे, नीतिधर्मांचे आचरण करायला लावणे, समाजासमोर उत्तम व्यक्तिमत्त्वाचा आदर्श ठेवणे, दुसऱ्याचे दुःख न पाहवल्याने सदैव परोपकाराला सिद्ध असणे, राजकारण असो, धर्मकारण असो किंवा समाजकारण असो, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये विवेकाचीच कास धरणे, वाणीमध्ये गोडवा ठेवून जिकडे तिकडे जनप्रियत्व संपादन करणे, बहुजन समाजाला भगवंताच्या नामाला लावून ईशसन्मुख बनविणे, एकान्त आणि लोकान्त यांचा समतोलपणा राखून, आपल्या हातून घडणे शक्य असणारे कार्य चटकन करून टाकणे, आपल्या संगतीत राहणाऱ्या माणसात सुंदर बदल घडवून आणणे, अत्यंत निःस्पृहपणे वागणे, आत्मज्ञानाचा जिव्हाळा सतत ठेवणे वगैरे कितीतरी उत्तम गुण नेत्याच्या अंगी असायला हवेत.

ज्याप्रमाणे एखादा पिता आपल्या सगळ्या मुलाबाळांची काळजी वाहतो, त्याचप्रमाणे श्रीसमर्थांनी वर्णन केलेला लोकनेता अगदी तितक्याच आपलेपणाने सर्व लोकांची चिंता वाहतो आणि त्यांची आतून व बाहेरून उन्नती करण्यासाठी नाना तऱ्हेचे उपाय योजतो. त्याच्यापाशी विद्वत्ता असते, वक्तृत्वकला असते, स्वतः उत्तम वागण्याची सवय असते, त्यामुळे त्याच्या बोलण्याचालण्यात कोठेही विसंगती आढळत नाही. भगवंताच्या पायी स्वतःच्या स्वार्थाची आहुती दिली असल्याकारणाने श्रीसमर्थांचा नेता कोणाकडे कधीही काहीही मागत नाही. सगळे लोक सुखी असावेत इतकीच त्याची इच्छा उरते. मानवी जीवनात जे भव्य आहे, पवित्र आहे, उत्तम आहे, धर्माला अनुसरून आहे तेवढेच त्याला आवडते आणि जन्मभर तेच तो लोकांना शिकवितो. ज्या समाजात असे आदर्श नेते निर्माण होतात, तो समाज नक्कीच प्रगतीच्या मार्गावर वाटचाल करतो.

# स्वस्तिश्री प्रकाशने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | चार पुरुषार्थ | डॉ. श्री. द. देशमुख | – |
| २. | यक्षप्रश्न | प्रा. अनंतराव आठवले | रु. ४०/– |
| ३. | पूर्वरंगतरंग | स्वामी वरदानंद भारती | रु. ४५/– |
| ४. | पूर्वरंगतरंगिणी | स्वामी वरदानंद भारती | रु. ५५/– |
| ५. | श्रीसमर्थ अभिप्रेत लोकनेता | संकलन (मराठी) | रु. १२/– |
| ६. | श्रीसमर्थ अभिप्रेत लोकनेता | संकलन (हिंदी) | रु. ६/– |
| ७. | हिंदू धर्म समजून घ्या | स्वामी वरदानंद भारती | रु. १५/– |
| ८. | संघ-प्रार्थना | स्वामी वरदानंद भारती | रु. २०/– |
| ९. | राष्ट्रीय समाजापुढील आव्हाने | श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचे उद्बोधन पुणे. २८-७-९६ | रु. ८/– |
| १०. | साधक – साधना | स्वामी वरदानंद भारती | रु. ७५/– |

## मा. सुरेशराव केतकर ह्यांनी ह्या पुस्तकाविषयी लिहिलेल्या त्यांच्या 'प्रास्ताविक' मधुन

समर्थ वाङ्मय हे समाज-प्रबोधन, समाज-संघटन यासाठी लिहिले गेले. श्रीसमर्थांनी, समाजासमोर केवळ आध्यात्मिक विचार ठेवला नाही, केवळ व्यक्तिगत जीवनाच्या उत्थानाचे विचार साहित्यातून स्पष्ट केल नाहीत. समर्थांचे वाङ्मय राष्ट्रीयत्वाची जाणीव करून देणारे, संपूर्ण सामाजिक परिवर्तन व उत्थानाचे ते वाङ्मय आहे.

केवळ मी नाही तर संपूर्ण समाज सद्‌विचारी करण्याची शक्ती असलेले श्रीसमर्थ साहित्य आहे.

शक्तीसाठी समाज संघटित उभा राहिला पाहिजे. हा समाज-संघटन करणारा महंत, हा लोकसंग्राहक सामाजिक कार्यकर्ता, लोकनेता, श्रीसमर्थांनी दिला. जागोजागी मठ व मठातील संघटक महंत ही कल्पना श्रीसमर्थांनी दिली व साकार करून दाखविली.

लोकसंग्रह कसा असावा? कसा करावा? करणारा कसा असावा? त्याचे विधिनिषेध कोणते असावेत? या सर्वांचा प्रपंच श्रीसमर्थांनी केला व श्रीसमर्थांनी मांडला.

लोकशक्तीचा मार्ग लोकसंग्रह. ही प्रक्रिया जिवंत समाजात. अक्षुण्ण चालली पाहिजे. त्यासाठी धर्माच्या ध्रुवध्येयाने समाजात, समाजासाठी, समाजसंघटन करणारा कार्यकर्ता अखंड निर्माण होत राहिला पाहिजे, विकसित होत असला पाहिजे. त्यासाठी श्रीसमर्थांचे मार्गदर्शन समर्थ आहे.

त्या चिरंजीव, नित्यपरिणामकारक मार्गदर्शनाचे दर्शन करण्याचा हा प्रयत्न आहे.

*- सुरेशराव केतकर*